# महाराष्ट्र विधानसभा

**तिसरे अधिवेशन, २०२५**

**सन २०२५-२६ च्या पुरवणी मागण्यांवरील**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**गुरुवार, दिनांक ११ डिसेंबर, २०२५**

## सार्वजनिक बांधकाम विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - १७**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एच-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१६, गृहनिर्माण**<br>**बाब क्रमांक: १२०, रूपये:- २०,००,००,०००/-**<br>**डॉ. बाबासाहेब देशमुख** |
| (१) | १०१२ | १० | सांगोला तालुक्यातील सार्वजनिक बांधकाम विभागात क्षेत्रीय कर्मचारी कार्यरत असून त्यांच्या शासकीय निवासी इमारती जीर्ण झाल्या असून सदर इमारतीचे बांधकाम नव्याने करणे अत्यंत गरजेचे आहे . तरी सांगोला सार्वजनिक बांधकाम विभागात क्षेत्रीय कर्मचाऱ्यासाठी शासकीय निवासी इमारती चे बांधकाम करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एच-५**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ३०५४, मार्ग व पूल**<br>**बाब क्रमांक: १२१, रूपये:- ४,२४,००,००,०००/-**<br>**श्री. रोहित पाटील** |
| (२) | ९९९ | १०० | प्रामा ६ते अलकुड एम हरोली ते देशिंग भवानी खिंड इजिमा १७८ हरोली ते साखरेवस्ती ते अलकूड रस्ता तलावावरती पूल बांधणे व रस्ता करणे याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३) | १००३ | १०० | जरंडी तिसंगी वाघोली शेळकेवाडी आगळगाव लंगरपेठ इरळी कोकळे करलहट्टी रस्ता इजिमा १६३ भाग कोकळे ते करलहट्टी उर्वरित रस्ता सुधारणा करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (४) | १००६ | १०० | लंगरपेठ ढालेवाडी ढालगाव ते कदमवाडी घोरपडी इजिमा १६५ भाग ढालेवाडी ते ढालगाव रस्ता सुधारणा करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एच-७**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ५०५४, मार्ग व पूल यांवरील भांडवली खर्च**<br>**बाब क्रमांक: १२९, रूपये:- १,१५,००,००,०००/-**<br>**डॉ. बाबासाहेब देशमुख** |
| (५) | १०१६ | १० | सांगोला तालुक्यातील लोटेवाडी, आचकदाणी, गळवेवाडी, वाकी शिवणे, शिरभावी, खर्डी, तवशी, एखलासपूर ते प्रमुख राज्य मार्ग ८ ला जोडणारा शिरगाव, नेपातगाव ओझेवाडी रस्ता राष्टीय मार्ग ३९३ या राज्य महामार्गातील आचकदाणी ते |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | फॉरेस्ट ते, फॉरेस्ट ते वाकी शिवणे, वाकी शिवणे ते वाकी शिवणे हा रस्ता अत्यंत खराब झाला असून सदर रस्त्याचे बांधकाम करून सुधारणा करण्याची आवश्यक आहे तरी राज्य शासनाने सांगोला तालुक्यातील या रस्त्यासह इतर राज्य महा मार्गासाठी निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. वरुण सरदेसाई** |
| (६) | १०२७ | १०० | मौजे तळवली भंडकंबावाडी, ता.गुहागर,जि.रत्नागिरी येथील चिपळून ते गुहागर रस्तावरील भंडकंबा शाळेपासून सखाराम कांबळे यांच्या घरापर्यंत रस्ता तयार करण्याबाबत तसेच चरवली करुळ फाटा ते परचुरी व तळवली फाटा ते वडद गाव हा रस्ता तयार करण्यासाठी निधी उपलबध करुन देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एच-७**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ५०५४, मार्ग व पूल यांवरील भांडवली खर्च**<br>**बाब क्रमांक: १३०, रूपये:- १,१०,००,००,०००/-**<br>**डॉ. बाबासाहेब देशमुख** |
| (७) | १०१३ | १० | सांगोला तालुक्यातील घेरडी ते नरळे प्रमुख जिल्हा मार्ग १९८, मठ वस्ती ते एखतपूर प्रमुख जिल्हा मार्ग १८२ मांजरी ते देवकतेवाडी, धायटी, हालदहिवडी, गाय गव्हाण ते राष्ट्रीय मार्ग १४३ ला जोडणारा प्रमुख जिल्हा मार्ग, तसेच सांगोला ते आलेगाव रस्ता प्रमुख जिल्हा मार्ग २०९ तसेच बलवडी, चोपडी, बंडगरवाडी, सोमेवाडी, इराचीवाडी, कोळे, कोंबडवाडी ते किडेबिसरी रस्ता जिल्हा प्रमुख मार्ग या रस्त्यामध्ये सुधारणा करण्याची अत्यंत गरज आहे. सदर रस्ते हे पावसामुळे खड्डे निर्माण झाले आहेत, तरी राज्य शासनाने सांगोला तालुक्यातील प्रमुख जिल्हा मार्गांमध्ये सुधारणा करण्या करिता निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (८) | १०१४ | १० | सांगोला तालुक्यातील शिरभावी मेटकरवाडी, मेथवडे, देवळे, सावे, वाढेगाव, मेडशिंगी, आलेगाव वाकी घेरडी, हंगीरगे रस्ता प्रमुख जिल्हा मार्ग १६३ मधील देवळे सावे ते मेथवडे तसेच वाकी घेरडी ते घेरडी हा रस्ता अत्यंत ना दुरुस्त झाला अस्यून सदर रस्ताचे बांधकाम करून सुधारणा करण्याकरिता निधीची तरतूद करून निधी वितरीत करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. जयंत पाटील** |
| (९) | १०२४ | १०० | ईश्वरपूर (जि.सांगली) मतदार संघामध्ये सन २०२० मध्ये जिल्हा परिषद सांगली यांच्याकडून ११० कि.मी अंतराचे प्रजिमा दर्जाचे रस्ते सार्वजनिक बांधकाम विभागाकडे हस्तांतर होणे, फक्त ३२ कि.मी लांबीसाठी शासनाने अंशत: निधिची तरतुद केली असणे, सन २०२५-२६ मध्ये महाराष्ट्रात अतिवृष्टी झाल्यामुळे ग्रामीण भागातील रस्त्यांची मोठ्या प्रमाणात दुरावस्था झालेली आहे. सदर रस्त्यांची दुरावस्थेमुळे रहदारी व वाहतुकीस अडचणी निर्माण होत असल्याने उर्वरित ७८ |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | कि.मी लांबीसाठी शासनाने निधी उपलब्ध करुन देण्याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (१०) | १०१९ | १० | मौजे धामापूर (खालचा वाडा) बौध्दवाडी (ता.मालवण, जि. सिंधुदुर्ग) या ग्रामीण मार्ग क्रमांक ४०२ रस्त्याच्या सा.क्र.०/०० ते १/५०० मधील रस्ता दुरुस्तीचे काम जि.प.सिंधुदुर्गच्या विविध योजनांतर्गत प्राधान्याने प्रस्तावित करुन पूर्ण करण्याबाबत जिल्हापरिषद, सिंधुदुर्ग (सा.बां.विभाग) यांना मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांनी सूचना देणे, परंतु जि.प. सिंधुदूर्गने रस्त्याच्या सा.क्र.०/०० ते १/५०० मधील रस्ता दुरुस्तीचे डांबरीकरणाचे काम निधीच्या अनुपलब्धतेमुळे अद्यापपर्यंत हाती न घेतल्याने रेती वाहून नेणाऱ्या डंपरच्या वाहतुकीने संपूर्ण रस्त्यात खड्डे पडून रस्ता वाहतूकीस खराब, धोकादायक होणे, परिणामी या भागातील ग्रामस्थांनी उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, मालवण/सावंतवाडी यांचेकडे वारंवार मागणी करुनही ग्रामीण मार्ग क्रमांक ४०२ रस्त्याच्या सा.क्र.०/०० ते १/५०० मधील रस्ता दुरुस्तीचे डांबरीकरणाचे काम अपूर्णावस्थेत असणे, ग्रामस्थांमध्ये निर्माण झालेली तीव्र संतापाची लाट, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एच-७**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ५०५४, मार्ग व पूल यांवरील भांडवली खर्च**<br>**बाब क्रमांक: १३३, रूपये:- ९,२५,०८,००,०००/-**<br>**श्री. बापूसाहेब पठारे** |
| (११) | ९८० | १० | पुणे शहरात दिवसेंदिवस होत असलेल्या नागरिकांनामुळे वाहतूक कोंडीचा प्रश्न अत्यंत जटिल झालेला असणे, नागरिकांना तासंतास वाहतूक कोंडीचा सामना करावा लागतो याला पर्याय म्हणून पुणे शहराच्या बाह्यमार्गातून वर्तुळाकार (रिंग रोड) प्रस्तावित करण्यात येणे, सदरचा रस्ता पुणे शहरासाठी अत्यंत महत्त्वाचा असणे, परंतु सदर रस्ता गेली अनेक वर्षापासून प्रलंबित असणे, सदरचा रस्ता होण्यास विलंब होत असल्यामुळे या प्रकल्पाची किंमत दिवसेंदिवस वाढत जाणे नागरिकांच्या जमिनी त्याचे भूसंपादन याकरिता द्यावयाचा मोबदला वाढणे अशा प्रकारच्या नानाविध अडचणींना सामोरे जावे लागणार असल्याने सदरचा रस्ता तातडीने पूर्ण करण्यासाठी उपाययोजना करणे गरजेचे याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एच-८**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ४०५९, सार्वजनिक बांधकामावरील भांडवली खर्च**<br>**बाब क्रमांक: १३४, रूपये:- ५,००,००,०१,०००/-**<br>**डॉ. बाबासाहेब देशमुख** |
| (१२) | १०१७ | १० | सांगोला तालुक्यातील महासूल विभागांतर्गत विविध शासकीय कर्मचाऱ्याकरिता निवासी इमारतींची सोय नसल्याने तहसीलदार नायब तहसीलदार व इतर |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | कर्मचाऱ्याना राहण्यासाठी निवासी इमारतीची आवश्यकता असून सांगोला येथे शासकीय जमीन सुद्धा उपलब्ध आहे तरी तहसीलदार, नायब तहसीलदार व इतर कर्मचाऱ्याकरीता निवासी इमारतीचे बांधकाम करण्यासाठी राज्य शासनाने निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१३) | १०१८ | १० | अलिबाग हे रायगड जिल्ह्याचे मुख्यालय असून अलिबाग तालुक्यातील महसूल विभागांतर्गत विविध शासकीय कर्मचाऱ्याकरिता निवासी इमारतींची सोय नसल्याने निवासी उप जिल्हा अधिकारी, उप विभागीय अधिकारी, तहसीलदार, नायब तहसीलदार व इतर कर्मचाऱ्याना राहण्यासाठी निवासी इमारतीची आवश्यकता असून अलिबाग येथे शासकीय जमीन सुद्धा उपलब्ध आहे तरी निवासी उप जिल्हा अधिकारी, उप विभागीय अधिकारी तहसीलदार, नायब तहसीलदार व इतर कर्मचाऱ्याकरीता निवासी इमारतीचे बांधकाम करण्यासाठी राज्य शासनाने निधीची तरतूद करण्याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एच-८**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ४०५९, सार्वजनिक बांधकामावरील भांडवली खर्च**<br>**बाब क्रमांक: १३५, रूपये:- १,०००/-**<br>**डॉ. बाबासाहेब देशमुख** |
| (१४) | १०२० | १० | राज्यातील विविध ठिकाणी गृह परिवहन विभागाच्या अखत्यारीतीत असलेले प्रादेशिक व उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या इमारत बांधकामासाठी पुरवण्या मागण्या मध्ये निधीची तरतूद केली आहे. परंतु सांगोला येथील नागरिकांना वाहन खरेदीनंतर त्याची पासिंग तसेच वाहन चालक परवाना (ड्रायव्हिंग लायसन) व इतर कामे करण्याकरिता उप प्रादेशिक कार्यालय अकलूज येथे जावे लागते तरी सांगोला तालुक्यासाठी स्वतंत्र उप प्रादेशिक परिवहन कार्यालय निर्माण करून इमारत बांधकाम करण्यासाठी निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एच-८**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ४०५९, सार्वजनिक बांधकामावरील भांडवली खर्च**<br>**बाब क्रमांक: १३९, रूपये:- ३,०००/-**<br>**डॉ. बाबासाहेब देशमुख** |
| (१५) | १०२१ | १० | राज्यातील विविध ठिकाणी कृषी विभागांतर्गत व इतर संबंधित कामे करण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. सांगोला, पंढरपूर तालुके हे कृषी प्रधान तालुके असून या ठिकाणी शेतकऱ्यांना कामासाठी कृषीभवनाची आवश्यकता आहे तरी सांगोला, पंढरपूर या तालुक्यासाठी कृषीभवन मंजूर करून कृषी भवनाच्या बांधकाम करिता निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (१६) | १०२२ | १० | राज्यातील विविध ठिकाणी कृषी विभागांतर्गत व इतर संबंधित कामे करण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे . अलिबाग, रोहा , मुरुड हे तालुके हे भाताचे कोठार म्हणून ओळखले जाते या ठिकाणी शेतकरी प्रगतशील असून विविध योजनांसाठी येथील शेतकऱ्यांना कृषीभवनाची आवश्यकता आहे. तरी अलिबाग, रोहा, मुरुड या तालुक्यासाठी कृषीभवन मंजूर करून कृषी भवनाच्या बांधकाम करिता निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एच-८**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ४०५९, सार्वजनिक बांधकामावरील भांडवली खर्च**<br>**बाब क्रमांक: १४०, रूपये:- ३,०००/-**<br>**डॉ. बाबासाहेब देशमुख** |
| (१७) | १०२३ | १० | जिल्हा सहकारी बँक, विविध कार्यकारी संस्था, सहकारी दुध संघ, हे ग्रामीण भागातील सर्वसामान्य जनतेशी जोडणारी वाहिन्या असून विविध संस्थांचे लेखापरीक्षण, सहकार न्यायालय, विभागीय सह निबंधक कार्यालय, जिल्हा सह निबंधक, उप सह निबंधक या सहकार क्षेत्रातील कार्यालयाशी अनेक दैनंदिन कामे होत असतात. सांगोला तालुक्यातही मोठ्या प्रमाणात सहकार क्षेत्र कार्यरत आहे. यासाठी सहकार क्षेत्रातील सार्व विभाग एकाच ठिकाणी असावेत अशी तेथील नागरिकांची मागणी असून सहकार संकुल इमारतींचे बांधकाम करण्यासाठी राज्य शासनाने मंजुरी देऊन निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

---

**विधान भवन**
**नागपूर,**
**दिनांक : १० डिसेंबर, २०२५**

**जितेंद्र भोळे,**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) सार्वजनिक बांधकाम विभाग
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.